
# मराठी दलित साहित्य

## सुरुवात–शैली व समाज

# प्रस्तावना

- मराठी दलित साहित्याला व दलितांच्या संस्कृतिच्या चळवळीला एकोणिसाव्या शतकापासूनचा इतिहास आहे. एकोणिसाव्या शतकापासून मराठी दलित साहित्याला नवचैतन्य प्राप्त झाले असे आपल्याला इथे आवर्जून नमुद करावे लागेल. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लढाऊ नेतृत्वाने सामाजिक आंदोलनाला जसे वैचारिक आणि कृतिपर अधिष्ठान प्राप्त झाले तसेच महाराष्ट्रातील मराठी साहित्याला सुध्दा वैचारिक आणि कृतिपर अधिष्ठान प्राप्त झाले. दलित साहीत्यामधूनच मराठी विद्रोही साहित्याची निर्मिती झाली. त्यानंतर दलित साहित्यात काव्य, कादंबरी लेखन, नाटक, शायरी, पोवाडे, कथा इत्यादी साहित्य प्रकारामधून दलित समाजाचे कला, साहित्य, जिवन समस्या, स्वप्ने, शैली साहित्यामधूनच बाहय लोकांसमोर येऊ लागले. त्यात तुकाराम महाराजांनी अभंगामधून ब्राम्हणवादी विचारांवर टिका केली आहे. तसेच शाहीर भेगळे, किसन बनसोडे, अण्णाभाऊ साठे, वामन करडक, कवी दिनबंधु, नामदेव ढसाळ, लक्ष्मण माने, दया पवार, त्र्यंबक सपकाळे, हेमंत नागदिवे, भ. मा. परसवाले यांचे साहित्य तर हल्लीच्या संभाजी भगत यांच्या शायरी कला आणि वेगवगळया चित्रकारांच्या चित्रशैली पर्यंत दलित साहित्य व विद्रोही साहित्य हे साहित्य क्षेत्रात आपली छाप पाडली आहे. आधुनिक भारतीय साहित्यातील मानव्याची कक्षा विकसीत–विस्तारीत करण्याचे व त्याला वैश्विक प्रत्ययकारीता लाभवून देण्याचे सुप्त सामर्थ्य मराठी दलित साहित्यात आहे. मराठी दलित आणि विद्रोही साहित्य यांची माहिती समोर काही चित्रशैली मधून तर काव्य स्वरुपामधून आपण पाहणार आहोत.




गोलपिठा या काव्य संग्रहाचे मुखपृष्ट स्वत: कविनेच म्हणजे नामदेव ढसाळानींच रेखाटलेले आहे. पाठमोऱ्या निद्रिस्त अशा विवस्त्र स्त्रिचे चित्र त्यांनी अशा कुशलतेने रेखाटले आहे, कि ते सृष्टीचे प्रतिक ठरावे; तिच्या योनीतून अवतरलेल्या फांदीला चार किरकोळ फुले व एक मानवी कवटीही लटकवलेलर आहे. आलवरच्या मानव संस्कृतिचे किरकोळ संचित व त्यातून मुडद्यासारखी जगविलेली दलित व्यक्ती याचे सुचक दर्शन ढसाळांचे हे छोटे रेखाटन घडविते.

# दलित स्वातंत्र्य व शब्दब्रह्म

दलित समाजाला स्वातंत्र्य मिळण्याचे भान ज्यावेळी आले, त्याचवेळी त्याला स्वतंत्र भाषेचे सामर्थ्यही प्राप्त झाले. शब्द व स्वातंत्र्य हे दोन्ही नेहमीच हातात हात घालून वाटचाल करीत असतात. दलित समाज युगानुयुगे पारतंत्र्यात खितपत होता म्हणून त्याला भाषेचे स्वातंत्र्य लाभले नाही. एका तथाकथीत प्रगत संस्कृतीच्या खटाऱ्यामागे मुक्या जनावरासांरखा तो रखडत होता. त्याला माणसासारखी जीभ होती, श्वासनलिका होती, कंठ होता आणि त्याची ही भाषेची इंद्रिये निकामी करून ठेवली होती. त्याला संवेदना होत, सुखदु:खे होती, आशा–आकांशा होत्या; पण त्यांना अभिव्यक्ती देणारी भाषा नाकारली होती. ही परिस्थिती जेव्हा बदलली, तेव्हा स्वातंत्र्य नी भाषा या दोन्ही गोष्टी एकरूप होऊनच त्या समोर आल्या. दलित साहित्याचा जन्म दलित स्वातंत्र्याच्या गर्भातुनच झाला.

नामदेव ढसाळांनी एका कवितेत म्हटले आहे :

“मी तुला शिव्या देतो, तुझ्या ग्रंथाला शिव्या देतो,

तुझ्या संस्कृतीला शिव्या देतो,

तुझ्या पाखंडीपणाला शिव्या देतो
मी हे सारं काही बोलणार नव्हतो पण माझे हात जागे झाले...”
‘बेंबीचा देठ ओल्या होण्याच्या वयात’
—‘गोलपिठा’

दतितेतरांविषयी खुशी नि खंद दर्शविणारी दुहेरी विणीची जाणिव त्र्यंबक सपकाळे यांच्या दलितकाव्यातून रूपास आलेली आहे.


“ आत्मा परमात्मा अन् परब्रह्म
या तीन खुटयांवर मांडलेला तुझा पाला
आयुष्यभर तु राहिलीस बाई
झालीच नाहीस तु कधी आई
भुक तुझी मातृत्वाची
भागवू शकेन मी
होशील का तु आई
मी दत्तक यायालातयार आहे.”

संस्कृतिचे मातृत्व मानावयास तयार असलेले दलित मन इथे एका मंगल नात्याच्या बांधणीसाठी आसुसलेले दिसते. जवळीक नी दुरावा यांचे नाटयात्म संवेदन खास दलित मनाचे आहे.

## दलित काव्यसंवेदन : कोंडवाडा

## कवी: दया पवार

या अकरा ओळीच्या कवितेत विषादाचा तिव्र स्वर निनादत आहे हा विषाद मनमनाचा बेडया वागविण्याचा, गाळात रूतलेल्या हत्ती प्रमाणे पशूवत जिण्यात रूतलेल्या ध्ययाकाक्षांचा आहेत. त्यात तगमगलेल्या सहनशीलतेचा हंबरडा आहे. जन्मोजन्मीच्या कोंडवाडयातील कैदीची मनस्वी टोचणी आहेत. कैदयासारखे परित्यात्क जिणे जगत असल्याची बोचक खंत आहे. स्पर्शासस्पर्शाच्या गहजबाची ओरड आहे. या परिस्थितीत अधिकच अंधार माजविणारे नवे प्रश्न कविला भेडसावत आहे. आपण कोण? आलो कोठून? आपला गुन्हा काय? या प्रश्नांनी त्रस्त झालेले मन ! हे प्रश्न उकलू पहावे तर पुन्हा अश्मयुगाचा घनदाट काळोख! प्रश्न परिस्थिती सकट अधिकाधिक अंधारात जात आहे. म्हणुनच कवी शेवटी तिव्र वैफल्याने म्हणतो की, पुस्तकांची ओळख झाली नसती व गावची गुरे वळली असती, तर विषादाच्या—वैफल्याच्या इंगळया डसल्या नसत्या! कवीने समाजाकडून दलितांना होणारी अन्यायाची भावना या काव्यातून विषद केली आहे.



# नवे दलित कवी

- नव्या दलित कवींना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारप्रणालीचा वारसा जवळून लाभला नि काव्यप्रणालीचा परिचय मराठी कवींच्या ठराविक परंपरेचा प्राप्त झाला. त्यात पुर्वोक्त दलित कवींना स्थानच नव्हते. त्यामुळे आपल्या स्वतंत्र भाषेचे, स्वतंत्र शब्दाचे या कवींचे भान अभुतपुर्व होते. असे भान वामन निंबाळकरांनी अचुकपणे व्यक्त केलेले आहे. त्यांच्या 'शब्द' या कवितेत ते म्हणतात,

  “ शब्दांनीच पेटतात घरे दारे देश
  आणि मानसे सुध्दा शब्द विजवतात आगही
  शब्दांनीच पेटलेल्या माणसांची.
  डोळयातून आगीच्या ठिणग्या,
  वाहीले नसते महापूर आसवांचे,
  आले नसते जवळ कुणी
  गेले नसते दूर —
  शब्द नसते तर —”

या कवितेतील शब्दाचे, भाषेचे तत्वज्ञान हे खास दलित तत्वज्ञान आहे. ही कविता केवळ अलंकारिक नाही, घोषणाबाज नाही. ती मिमान्सक आहे, तात्विक आहे.

# एक विलक्षण जाणिव चित्र : अस्मितादर्श १९७६

अस्मितादर्शच्या १९७६ च्या दिवाळी अंकावरील भ. मा. परसवाले यांचे मुखपृष्ठावरील चित्र वैशिष्टयपूर्ण आहे. यांवर दोन काळी कबंधे बाहू उभारून लालभडक सुर्यबिंब पेलण्याचा प्रयत्न करीत आहे. जमिनीत रूतून बसलेल्या बिनचेहऱ्याच्या या मानवदेहांचा उर्ध्वगामी उमाळा, त्यांच्या पायात मनामनाच्या बेळया घातल्याचा प्रत्यय, सगळा जीव ओतून उभे राहण्याची धळपळ इत्यादी भाव या चित्रातून जाणवतात. हे चित्र पाहतांना त्यातील जाळ मांडया व पाय यांची भूगतरूद्धता आणि अगतिकता याची प्रचिती येते आधुनिक इंग्लिश शिल्पकार जेकब एप्स्टाइनच्या ॲडम (१९३९) या गाजलेल्या शिल्पाची हे चित्र आठवण करून देते. दलित जाणिवांचे एक विलक्षण कलात्मक अभिव्यक्ती या चित्रातून प्रभावीपणे सूचित होते. परसवाल्यांच्या या चित्रात काळया कबंधांना दलितत्वाचा खास अर्थ प्राप्त झालेला दिसतो.



'अस्मितादर्श'
दिवाळी अंक १९७६ चे मुखपृष्ठ.
भ. मा. परसवाले.

## दलित कलाक्षेत्राची बीजे : निकाय

नवे दलित कलाक्षेत्र यांची बीजे एकोणविसाव्या शतकातच रूजू लागलेली होती. उदा. अस्मितादर्श, निकाय यासांरख्या दलितांच्या नियतकालिकातून दलित चित्रकला वेगळे रूप घेतांना आढळते. भ. मा. परसवाले, हेमंत नागदेवे, भाऊ समर्थ, प्रकाश कामीतकर, दिलीप सुर्यवंशी, भांजीबाई पाटणकर, प्रकाश पाटील यासांरखे तरूण चित्रकार दलित जाणिवांचा रंगरेखात्मक अविष्कार साधू पहात होते. निकाय द्वैयमासिकाच्या १९७६ च्या दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठावर हेमंत नागदिव्यांचे वेदक चित्र आहे : फिक्या शेंदरी वारूळाखाली फुत्कारणाऱ्या नागराज्याच्या दोन जिभा विस्तारून एकित लेखणी व दुसरीत किल्ली दाखविलेली दिसत आहे; आनंद स्तमित युवक–चेहऱ्याच्या माथ्यावर सर्पाचा वलय मुखुट आहे, त्याच्या खांदयावर, एजिटेट, ऑर्गनाइज व एज्युकेट हे पुज्य बाबा साहेबांचे वचन दिसत आहे. या चित्रातील दलित जाणीव प्रतिक रूपाने स्पष्ट होते.




'निकाय'
दिवाळी अंक १९७६ चे मुखपृष्ठ.
हेमंत नागदिवे.

# विद्रोहाच्या विराट व्यक्तीचे प्रभावी काव्यचित्र

समग्र विद्रोह मराठी साहित्यातच नव्हे, तर भारतीय साहित्यातही अशा रूपात प्रकट झालेल्या आहे काय? गौतम बुद्ध, चार्वाक, महात्मा फुले यांची परंपरा ही विवेकवादी विद्रोहाची आहे. उत्थानगुंफेचा विद्रोहवाद भावनाशिल कवीप्रकृतीची आहे. भावनेचा अंत लागत नसतो म्हणून विवेकवादी विद्रोहाच्या मर्यादा झपाटयाने ओलांडून जाणारा आवेग, उत्थानगुंफेच्या 'निषेधनाम्यात' आहे. या समग्र विद्रोहाच्या विराट व्यक्तीचे प्रभावी चित्र नजर फाडून टाकणारी आहे. कवी म्हणतो –

"जीवनाची नग्नता झेंडयासारखी हाती घेऊन
आजवरचे वंदनीय हिशेब नाकारावे लागतील
भारतीय परमात्म्याने डिक्लअर केलेल्या गुलामासारखी
जीवनाची सर्व षंढ तत्वज्ञाने पुसावी लागतील
सर्वच बेरजा कशा होऊ शकतात
कटु भागाकारही करावे लागतील
अडाणी पायावर उभे सर्वच शतकांचे आंधळे मजले
आजच्या आगीत पूजेपूर्वी जाळून पाहावे लागतील
उगीच दीर्घायू ठरलेले सन्मानीत आशय
आजच्या उजेडात चाळावे लागतील
मेंदू लुबाडणाऱ्यांवर मन:पूर्वक थुंकताना
संतापाच्या इतरही जागा मांडाव्या लागतील
जीवनासाठी जिवनाचे आधार नाकारावे लागतील
साऱ्या जीवंतांना मेलेल्यांचे शेजार नाकारावे लागतील"